## बालकांच्या आहारातील आणि खाण्याच्या बाबतीतील काही समस्या/ तक्रारी



- स्तनपान घेता न येणे
- तोंडाने योग्य प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात आणि कमी दाबाने दूध ओढून घेते
- खाऊन किंवा पिऊन झाल्यानंतर उलटी करणे / थुंकून देणे
- वारंवार भूक लागणे
- खाऊन झाल्यानंतर पोट खराब होणे
- पिताना, भरवताना शरीर कडक करून घेणे
- वयानुसार बाळाचा विकास न होणे
- खूप कमी वेळ किंवा रेंगाळत पिणे, खाणे
- घट्ट पदार्थ खायला नकार देणे
- तोंडातून अन्न बाहेर टाकणे / गाळणे
- वयानुसार लागणारे अन्न खाता न येणे
- विविध प्रकारच्या पोताचे पदार्थ खायला न आवडणे
- मळमळणे
- घशात घास अडकणे आणि सतत ठसका लागणे
- सतत श्वसनाचा त्रास असणे

# INTRODUCTION TO FEEDING DEVELOPMENT

**बाळाची वयानुसार व्यवस्थित आणि योग्य वाढ व्हावी यासाठी त्यांना पोषक आहार देणे गरजेचे असते. वयानुसार त्यांच्या आहारात आणि त्यांच्या खाण्याच्या पद्धतीत देखील बदल होत असतात.**




Unnati
PEDIATRIC REHABILITATION CENTER
Building Up Milestone


## आहाराच्या काही टिप्स

- शक्य तितके बाळाच्या आहाराच्या वेळा सांभाळा
- बाळाला भरवताना वातावरण शांत असू द्या तसेच मोबाइल किंवा तत्सम उपकरणे वापरू नका
- बाळाच्या आहाराची वेळ हि तुमच्या आणि बाळाच्या जवळीकता वाढवण्यासाठी महत्वाची ठरते, त्यासाठी तुम्ही बाळाकडे विशेष लक्ष्य द्या
- बाळाला त्याच्याकडे प्रेमाने बघत, बोलत किंवा एखादे गाणे म्हणत भरवावे

Unnati Pediatric Rehabilitation Center, Warje, Pune Email- unnatiprc@gmail.com Contact- +91 9561879749

| Unnati<br>PEDIATRIC REHABILITATION CENTER<br>Building Up Milestones | आहाराचे टप्पे | वयानुसार योग्य आहार | आहाराच्या टिप्स |
| --- | --- | --- | --- |
| ० ते ३ महिने आणि नवजात बालक<br> | • दुधाची बाटली किंवा स्तनावर मजबूत पकड ठेवते<br>• पिण्यासाठी जीभ मागे पुढे ढकलते<br>• बाळ जवळपास २०० मिली दूध प्रत्येक फीडिंग ला, दिवसातून ६ वेळा फीड केल्यास घेते<br>• दूध व्यवस्थित ओढते आणि गिळते | • स्तनपान | • बाळाची पचनसंस्था आणि जबड्याचे स्नायू यांचा विकास अजून पूर्ण झालेला नसतो, त्यामुळे त्यांना चावायला लागणारे पदार्थ देऊ नयेत<br>• बाळ वस्तू तोंडात घालून बघत असते, त्यामुळे बाळाच्या घशात ते अडकणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे |
| ४ ते ६ महिने आधार दिल्यावर बसू शकणारे बाळ<br> | • खायच्या वस्तू आवडू लागतात<br>• चमचा जवळ नेल्यावर तोंड सहज उघडते<br>• घनसम पातळ पदार्थ तोंडात घेतल्यावर जीभेने मागे ढकलते<br>• घनसम पातळ आणि सेरेलॅक सारखे पदार्थ खायला आवडते | • स्तनपान, सेरेलॅक सारखे पदार्थ<br>• मऊ, प्युरी केलेले पदार्थ जसे गाजर,<br>• रताळी, सफरचंद | • घनसामान पातळ पदार्थाचं द्यावेत<br>• बाळाला दर ३ दिवसांनी वेगवेगळ्या प्रकारचे अन्न द्यावे<br>• पूर्ण घन पदार्थ देताना आहाराची सुरुवात आणि शेवट हा पातळ पदार्थांनी करावा<br>• घन पदार्थ आहार म्हणून देताना मान, पोटाचे स्नायू पूर्ण विकसित झालेले असणे गरजेचे आहे |
| ७ ते ९ महिने रांगणारे/ आधाराशिवाय बसणारे बालक<br> | • खुर्चीत बसून बाटलीतून स्वत: दूध पिते<br>• घन पदार्थ खायला सुरु करते<br>• या वयात दात येत असताना हिरड्या सुजतात त्यामुळे मऊ खेळणी ते चावतात<br>• जवळपास असलेल्या खायचा पदार्थाकडे स्वत:हुन जाते<br>• नवीन पदार्थांच्या वासाला आणि चवीला कुतूहल दाखवते | • स्तनपान<br>• सेरेलॅक,दही,उकडलेले बटाटे व रताळी यांसारखे पदार्थ<br>• सहज खाता येतील असे केळ्याचे छोटे काप, चीज, मऊ ब्रेड आणि उकडलेले गाजर | • स्तनपानाला महत्व द्या<br>• बाळाला बाजारातले बाहेरचे पदार्थ देऊ नका<br>• बाळाला अधूनमधून स्ट्रॉ आणि वाटीतून पाताळ पदार्थ प्यायला द्या<br>• तसेच त्याला तुम्ही चमच्यातून पाजा<br>• आणि त्यांनाही स्वत:हून खाण्याचा प्रयत्न करू द्या |

Unnati Pediatric Rehabilitation Center, Warje, Pune    Email- unnatiprc@gmail.com    Contact- +91 9561879749

| आहाराचे टप्पे | | वयानुसार योग्य आहार | आहाराच्या टिप्स |
|---|---|---|---|
| १० ते १२ महिने चालायला शकणारे बालक<br> | • स्वत:च्या हाताने खाते<br>• विविध पदार्थ खाते<br>• वाटीने पाणी पिते<br>• मऊ भाज्या, फळे खाते<br>• चमचा आणि वाटी घेऊन स्वतः खायला शिकते | • स्तनपान<br>• वरण भात<br>• मऊ शिजवलेल्या दलाई<br>• चीज इ | • मुलाला दिवसातून ३ वेळा खायला द्या<br>• तुम्ही खात असलेलेच पदार्थ त्यांना कुस्करून द्या<br>• मुलाला भूक व्यवस्थित लागावी यासाठी नेहमीच्या वेळेप्रमाणे च खायला द्या<br>• घरातल्यांनीच एकत्र बसून जेवणे |
| एक वर्ष आणि मोठे मूल<br> | • पेल्यातुयन पाणी पिऊ शकते<br>• त्याला १ वर्षांपासून पुढे सर्व प्रकारचे अन्न खाता येऊ शकते | • एका वर्षापासून पुढे बाहेरचे दूध देता येईल<br>• काप केलेले फळे<br>• मऊ शिजवलेल्या सगळ्या भाज्या<br>• विविध पोताचे (कुरकुरीत, मऊ, पातळ, घट्ट इ.) पदार्थ | • स्वत:च्या हातांनी खायला शिकवा<br>• किती खायचे हे मुलाला स्वतःला ठरवू द्या<br>• घशात अडकून बसणारे पदार्थ - बदाम, काजू, शेंगदाणे, पॉपकॉर्न इ. |